Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume - IX, Issue - III
July - September - 2020
English / Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamSca

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - III JULY - SEPTEMBER - 2020

ENGLISH / MARATHI PART - I

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamSca

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | महिला सक्षमीकरण समोरिल आव्हाणे<br>**गोरखनाथ जिजेबा अवचार** | ५३-५६ |
| १३ | ग्रामीण अर्थव्यवस्थेत शाश्वत रोजगारात हस्तकला व हातमाग उद्योगाचे योगदान<br>**डॉ. वासंती निचकवडे** | ५७-६२ |
| १४ | साखरफेरा : ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या शोकांतिकेची कहाणी<br>**डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे** | ६३-६७ |
| १५ | भारत पाकिस्तान यांच्यातील मुख्य समस्या : काश्मीर<br>**प्रा. डॉ. एन. झेड. पाटील** | ६८-७३ |
| १६ | आदिवासी महिलांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीचे अध्ययन<br>(विशेष संदर्भ-गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुका)<br>**डॉ. प्रमोदकुमार केशव नंदेश्वर** | ७४-८२ |
| १७ | भारतातील अन्नसुरक्षीततेवर हवामान बदलाचा परिणाम<br>**प्रा. डॉ. दिलीप पांडुरंग महाजन** | ८३-८९ |
| १८ | नरहर कुरूंदकरांचे सांस्कृतिक इतिहास लेखन<br>**डॉ. क्षिरसागर बी. एस.** | ९०-९५ |
| १९ | आदिवासींचे बांबू व्यवस्थापन एक अध्ययन<br>**प्रा. डॉ. कुंदन एस. दुफारे** | ९६-१०० |





Scanned with CamSca

# १४. साखरफेरा : ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या शोकांतिकेची कहाणी

डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे
शि. प्र. मं. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली, जि. बुलढाणा.

प्रस्ताविक

ग्रामीण समाज जीवनाचे चित्रण करणाऱ्या लेखाकांमधील एक महत्त्वाचे म्हणून मोहन पाटील यांचे नाव घेतले जाते. त्यांनी कथा, कादंबरी, कविता या प्रकारांमधून ग्रामीण समाज जीवनाचे चित्रण केले आहे. 'साखरफेरा' ही एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच २००६ मध्ये प्रकाशित झालेली ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारी महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. त्यांच्या कादंबऱ्यांचा नायक हा सामान्य शेतकरीच आहे. ज्या भागात ते राहतात त्या कोल्हापूर-सांगली सीमेवरचा प्रदेश तिथल्या समस्यांसह वास्तव रुपात त्यांच्या कादंबऱ्यांमधून चित्रित होतो.

'साखरफेरा' या त्यांच्या लोकप्रिय कादंबरीतून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची होणारी शोकांतिका त्यांनी समाजापुढे मांडली आहे. पहिल्या पिढीतील सहकाराच्या जाणकारांनी सहकारी साखर कारखाने उभे केले. काही भागात त्याद्वारे चांगली प्रगतीही झाली. परंतु सहकारी संस्थांमधील अर्थकारणामुळे हळूहळू या संस्था राजकीय व्यक्तींच्या हातात गेल्या.मुठभर सत्ताधाऱ्यांची मक्तेदारी या संस्थांमध्ये निर्माण झाली पिढ्यान-पिढ्या ही मक्तेदारी तशीच पुढे पुढे सरकते आहे. त्यामुळे नव्वदोत्तर काळात सहकारी साखर कारखान्यात मनमानी कारभार सुरू झाला. साखर कारखाने अवसायनात निघू लागले,आजारी पडू लागले.याची अनेक प्रकरणे पुढे आली.ज्या शेतकऱ्यांच्या हितासाठी सहकारी साखर कारखान्यांची उभारणी झाली तेच कारखाने उसाला चांगला भाव देईनासे झालेत. शेतकऱ्यांचे शोषण विविध मार्गांनी कारखान्याच्या प्रशासनाकडून होऊ लागले. त्यामुळे छोटा शेतकरी जास्त नुकसानीत येऊ लागला.याचा अतिरेक झाल्यानंतर सहाजिकच शेतकरी संघटनेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर ऊस आंदोलन उभे राहिले.अश्या शेतकरी आंदोलनाचे पडसाद 'साखरफेरा' या कादंबरी मधून उमटले आहेत.तसेच ऊस उत्पादकांना एवढा त्रास सहन करावा लागत असूनही शेतकऱ्यांची ऊस पिकावरची श्रद्धा का ढळत नाही? असा प्रश्न प्रस्तुत कादंबरीतून उपस्थित होतो.महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची डबघाईस आलेली वास्तव स्थिती,त्याला जबाबदार असलेले घटक,त्यातून भरडला जाणारा सामान्य शेतकरी, त्यातून उभे राहिलेले शेतकरी आंदोलन या परिस्थितीचे वास्तव चित्रण 'साखराफेरा' कादंबरीतून आलेले आहे. सोबत खाऊजा धोरणाच्या या काळात सहकारी संस्था कशा अडचणीत येऊ पाहात आहेत याचेही चिंतन मोहन पाटील या कादंबरीतून करताना दिसतात.

- ऊसउत्पादक शेतकऱ्यांचे ज्वलंत प्रश्न आणि 'साखरफेरा'



Scanned with CamSca

साखर उत्पादनात भारत हा जगात अव्वल स्थानी असलेला देश आहे.सहाजिकच ऊस हे देशातील शेतकऱ्यांचे एक महत्त्वाचे पीक आहे.महाराष्ट्रात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात ऊस पिकवला जातो.मात्र नव्वदोत्तर काळात शेती व्यवसायासमोर गंभीर आव्हाने उभी राहिलेली आहेत. सहकार चळवळीला सुद्धा भ्रष्टाचाराने पोखरून काढले आहे.त्यामुळे जागतिकीकरणाच्या या काळात सहकारी बँका, पतसंस्था,सहकारी साखरकारखाने,इतर काही सोसायट्या अवसायनात निघून त्यांचे दिवाळे निघू लागलेले दिसते.दुसऱ्या बाजूला ऊस उत्पादक शेतकरी वाढती महागाई आणि वाढता उत्पादन खर्चामुळे मेटाकुटीस आलेला दिसतो.ऊस उत्पादनाचा एकूण खर्च बघू जाता त्याला साखर कारखान्यांकडून मिळणारा दर खूपच कमी मिळतो.अगोदरच आजारी पडत चाललेली सहकारी चळवळ शेतकऱ्यांना योग्य भाव देऊ शकली नाही. सुस्थितीतील कारखाने सुद्धा ऊस उत्पादकांना दराबाबत न्याय देऊ शकले नाहीत. त्यामुळे ऊसाशेती तोट्याची ठरू लागली.साखरकारखाने आणि शासन ऊस उत्पादकांचे शोषण करीत आहेत.अशी भावना शेतकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झाली व त्यातून पश्चिम महाराष्ट्रात ऊस उत्पादकांची उग्र आंदोलने सुरू झालीत.ऊसाला परवडेल असा दर मिळालाच पाहिजे यासाठी शेतकरी रस्त्यावर उतरले. कारखान्यातील भ्रष्टाचाराची प्रकरणे उजागर करू लागले. पश्चिम महाराष्ट्रातील एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीचे हे वास्तव 'साखरफेरा' मधून मोहन पाटील यांनी उभे केले आहे. 'साखरफेरा' प्रकाशित झाली त्या काळातील पश्चिम महाराष्ट्रातील हे वास्तव चित्र होते.अगोदरच्या लघु कादंबऱ्यांच्या वेळी वर्तमानकालीन ग्रामवास्तवाशी प्रामाणिक राहिलेले मोहन पाटील ताज्या वास्तवाशीही प्रामाणिक राहिल्याचे 'साखरफेरा' कादंबरीतून दिसून येते'.[1] 'साखरफेरा'मधील किशा खोत हा अल्पभूधारक ऊस उत्पादकाचा प्रतिनिधी आहे. ऊस उत्पादक शेतकरी छोटा असो की मोठा त्याला कर्ज काढूनच ऊस लागवड करावी लागते. किशा ऊस जळाल्यामुळे शेवटी दावणीची जनावरे विकून कर्ज फेडतो. तर विविध कार्यकारी विकास सोसायटीचे अध्यक्ष जयसिंग अण्णा हे मोठे ऊस उत्पादक शेतकरी आहेत परंतु तेही कर्जबाजारी आहेत. म्हणजेच उस शेती ही कर्ज काढूनच केली जाते त्यामुळे सर्वच शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले असतात. जागतिकीकरणानंतरच्या काळात इतर शेतमालासारखाच उसालाही उत्पादनखर्चावर आधारित दर मिळेनासा झाला. त्यामुळे छोटा मोठा शेतकरी डबघाईस येऊन कर्जबाजारी झाला. बंडा पाटकरी हा एक शेतकरी किशाला म्हणतो,"सताठ वर्ष कारखाना उसाला चांगला दर देत न्हाई. हिकडं खर्च वाढत चाल्लाय. पाणी खत मशागत लाईटी सारच म्हाग झालंय. आत्ताची गोष्ट म्हंचीला तर ऊस वाली कर्जात बुडल्यात."(पृष्ठ 122) दुसऱ्या पिकांची दरस्थिती ऊसापेक्षाही हलाखीची असल्यामुळे जो-तो ऊस लागवड करतो. साखर कारखाने सुद्धा अल्पभूधारक आणि इतरही छोट्या-मोठ्या शेतकऱ्यांना ऊस लागवडीसाठी प्रोत्साहित करतात, जबरदस्तीने शेअर्स देतात आणि कारखान्याचा त्याला मालक बनवतात. केवळ म्हणण्या पुरता मालक असलेल्या या शेतकऱ्याचा कारखान्यातील घाणेरड्या व भ्रष्टाचाराने बरबटलेल्या राजकारणाने कारखान्याच्या खऱ्या मालकाचाच घात केला.

ऊस विकास योजनेच्या नावाखाली बँकेच्या व्याजदरापेक्षा तीन टक्के अधिक व्याज घेऊन ऊस लागवडीसाठी कर्ज दिले जाते. ऊस कारखान्यात आल्यानंतर पहिल्या हप्त्यातून कर्जाची वसुली केली जाते



Scanned with CamScanner

आणि कर्ज बसूल झाल्यानंतर शेतकऱ्याकडे फारशी रक्कम उरतच नाही. म्हणजेच बँक असो की साखर कारखाने त्यांनी व्याजदरांमध्ये शेतकऱ्यांची प्रचंड लूट केलेली आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक मजबुरीचा फायदा घेतला आहे. अल्पभूधारक ऊस उत्पादकांना आर्थिक अडचणींमुळे अत्यंत वाईट अवस्थेत दिवस काढावे लागतात. कादंबरीतील शामा कोळी हा वरून सर्वांना हसत व आनंदी दिसतो. परंतु दारू पिल्यानंतर ढसाढसा रडतो. दहा हजार रुपयाचे कर्ज त्याने ऊस विकास योजनेतून ऊस लागवडीसाठी घेतलेले असते. मात्र त्यातले सहा हजार मुलीच्या बाळंतपणात खर्च होतात. त्यानंतर ऊस लागवड कशी करावी? हा यक्षप्रश्न त्याच्यासमोर उभा राहतो. अशाप्रकारे अस्मानी आणि सुलतानी संकटांचा सामना करता करता आजवर शेतकऱ्यांच्या कित्येक पिढ्या मातीत मिळाल्या आहेत.मोहन पाटलांनी उघड्या डोळ्यांनी बघितलेले हे ढळढळीत वास्तव 'साखरफेरा' मधून उभे केले आहे.

१९६० ते १९८० हा सहकाराचा सुवर्णकाळ मानला जातो.या काळात सहकार चळवळीने सबंध महाराष्ट्रात आपले जाळे विणले.त्यातल्या त्यात पश्चिम महाराष्ट्रात ही सहकाराची चळवळ तळागाळापर्यंत पोहोचली.पश्चिम महाराष्ट्रातील ऊस हे महत्त्वाचे पीक असल्यामुळे याच प्रदेशात सहकारी साखरकारखाने मोठ्या प्रमाणात उभे राहिले. त्यांच्या जोडीला इतरही विविध सहकारी संस्था,पतसंस्था उभ्या राहिल्या.परंतु सहकार क्षेत्रातील अर्थकारणामुळे राजकारण्यांनी लोकशाहीच्या नावाखाली या संस्थांवर वर्चस्व प्रस्थापित केले व भ्रष्टाचाराची कीड या क्षेत्राला या सुवर्णकाळातच लागली. पुढे नव्वदोत्तर काळात शेतीच्या प्रश्नांनी आणि सहकार चळवळींनी गंभीर स्वरूप घेतले. जागतिकीकरण उदारीकरण आणि खाजगीकरणामुळे निर्माण झालेली नवी आव्हाने सहकार चळवळीत समोर उभी राहिली. सहकारी बँका,पतसंस्था तोट्यात जाऊ लागल्या. त्यांचे दिवाळे निघू लागले. साखर कारखाने कर्जबाजारीपणामुळे आजारी पडू लागलेत, काही बंदही पडू लागले. कारखानेच डबघाईला आल्यामुळे ऊस दरात पाहिजेत अशी दरवाढ मिळाली नाही आणि वाढत्या महागाईमुळे ऊस उत्पादन खर्चात दिवसेंदिवस वाढ होत गेली. उसाला योग्य दर मिळत नसूनही ऊस शेतीचे क्षेत्र मात्र वाढत गेले.त्यामुळे अतिरिक्त उसाचेही कधीकधी प्रश्न उभे राहू लागले.यामुळे हळूहळू शेतकऱ्यांच्या मनात असंतोष वाढत गेला व त्याची परिणती शेतकरी आंदोलनात झाली.ज्या भागात हे घडले त्याच भागात राहणाऱ्या मोहन पाटील यांनी साखर कारखान्यातील भ्रष्टाचार आणि शेतकरी बांधवांचे ऊसदर आंदोलनाचे वास्तव त्यानी मांडले आहे. प्रस्तुत कादंबरीतील साखर कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत ऊसदराबाबत कारखाना प्रशासन खुलासा करते की,'साखर उद्योग सध्या भयंकर संकटात आहे कधी नव्हे एवढा तोटा कारखान्याला सहन करावा लागतो आहे. देशात साखर साठे पडून असताना सहकार मोडीत निघावे या दुष्ट हेतूने परदेशातून साखर आयात केली जात आहे. बाजारात साखरेची किंमत घसरली आहे.... त्यातूनही मार्ग काढून कारखाना उसाला योग्य भाव द्यायच्या प्रयत्नात आहे'.(पृष्ठ 20) मात्र शेतकरी संघटनेचे म्हणणे असते की, मुळात कारखाना प्रशासन भ्रष्ट आहे व त्यामुळे कारखाना तोट्यात आला आहे. कारखाना आणि शेतकरी यांच्यातील ऊसदराचा हा प्रश्न पुढे उग्र रूप धारण करतो. साखर कारखान्याची ऊस कोंडी केली जाते. गाळपासाठी ऊस कारखान्यात न्यू दिला जात नाही. मारामाऱ्या जाळपोळ यामुळे वर्तमानपत्रे चांगलीच रंगतात. शेवटी केंद्र सरकार या प्रश्नात हस्तक्षेप करून भरीव



Scanned with CamSca

मदतीची घोषणा करते तेव्हा आंदोलन हळूहळू शांत होते.'साखर कारखान्यातील घडामोडी, राजकारण आणि ऊस उत्पादक आंदोलनाचे चित्रण कादंबरीत येते.हे चित्रण ताज्या वास्तवाला अधिक ठसठशीत करताना दिसते.ऊस दरावरून कारखान्याविषयी सभासदांच्या मनामध्ये वाढत चाललेला असंतोष,चेअरमधी भ्रष्टाचाराकडे डोळेझाक, कारखान्यावर आलेल्या नव्या संकटांचा वाचलेला पाढा, कारखान्याची जनरल सभा म्हणजे आखाड्याचे मैदान, सभेच्या दिवशी कारखान्यांना आलेले पोलीस छावणीचे स्वरूप हे सर्व अलीकडच्या दहा पंधरा वर्षातील काही अपवाद वगळता कारखान्यांमधून दिसून येणारे चित्र साखर फेरा मध्ये बघायला मिळते.ज्यातून शेतकरी आंदोलनाला सुरुवात होते त्या आंदोलनाचे बारीक-सारीक तपशिलासह मोहन पाटील चित्रण करताना दिसतात'.[२] सहकाराच्या मूळ हेतू कसा मागे पडला हे सुद्धा मोहन पाटील यांना कादंबरीतून सांगावयाचे आहे. कादंबरीतील तुका सहकाराचा इतिहास सांगताना म्हणतो,"आम्ही साखर उद्योग,दूध प्रकल्प काढले. त्याच्या संगे सहकारी सोसायट्या,डेअरी, सहकारी बँका, पतसंस्था काढल्या त्यांचा मूळ उद्देश काय होता? चार माणसांनी एकत्र यायचं आपला भाग त्यात घालायचा आणि एकमेकांच्या सहकार्याने चौघांचाही समान विकास करून घ्यायचा... आता या बड्या बड्या सहकारी उद्योगात बोटावर मोजता येतील एवढ्या चार माणसांनीच विकास करून घेतला. बाकीचे कोरडेच... सामान्य गरीब शेतकरी नुसता कागदावर राहिला गेल्या दहा वर्षात उषाच्या प्रश्न इतका किचकट झालाय की, खुद्द महात्माजी जरी स्वर्गातून खाली आले तरी हा प्रश्न सोडवतो म्हणायचा तरी सुटायचं नाही. एवढी गुंतागुंत या प्रश्नात आहे." (पृष्ठ १९२,१९६) कायमस्वरूपी तोडगा न काढल्यामुळे शेतकऱ्यांची प्रश्न अधांतरी आहेत असे लेखकाला वाटते.तुका मेंबर चे सहकार क्षेत्र बद्दलची विवेचन म्हणजे सहकाराचे वर्तमान वास्तव आहे. तानाजीराव पाटील या कादंबरीबद्दल म्हणतात,'सहकाराची सर्व क्षेत्र आज भ्रष्टाचाराने बरबटलेले आहे.त्याचे वर्तमान वास्तव 'साखरफेरा' कादंबरीत मोहन पाटील यांनी मांडले आहे.ऊस शेतकरी आणि सहकार क्षेत्रातील भ्रष्ट व्यवहार या वेगळ्या विषयावर कादंबरी लिहून मराठी कादंबरी क्षेत्रात एक वेगळे विश्व त्यांनी समर्थपणे मांडले आहे. त्यामधून मोहन पाटील यांचा उस शेतकऱ्यांबद्दलचा जिव्हाळा व्यक्त होतो.छोट्या शेतकऱ्यांचा अनेक वेळा सहकारी साखर कारखान्याच्या षडयंत्रात बळी जातो.ते कर्जाच्या भोवऱ्यात गुरफटले जातात.वर्षानुवर्षे व्याजाची रक्कम भरण्यात त्यांची शक्ती खर्च होत असते.त्याचे वास्तव चित्र ही त्यांनी मांडले आहे'.[३]

'साखरफेरा' कादंबरीत मुख्यत्वे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या व ऊसदराबाबत चे आंदोलन हे केंद्रवर्ती मुद्दे असले तरी या अनुषंगाने कृषी क्षेत्रातील इतरही काही बदलांची दखल मोहन पाटील यांनी घेतलेली दिसते. शेतकऱ्यांच्या शेतीसाठी सुरळीत वीजपुरवठा हा नव्वदोत्तर काळातील एक महत्त्वाचा प्रश्न, सोबत पाणीपुरवठ्याचा प्रश्न त्याचेही विवेचन कादंबरीत आलेले आहे. जागतिकीकरणामुळे ग्रामजीवनात झालेले बदल त्याचेही प्रतिबिंब कादंबरीतून उमटलेले आहे. जी.के.ऐनापुरे या कादंबरीबद्दल म्हणतात,'प्रस्तुत कादंबरीत ऊस उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा-कथा, साखर प्रश्नांचा गुंता, त्यातच घडणारे सरधोपट सहकारमार्गी राजकारण, त्याच्या बदलासाठी अपरिहार्यपणे येऊ घातलेली नवीन विवेकशीलता सच्च्या ग्रामीण संवेदनशीलतेने कथात्म रूपात उलगडताना दिसते.ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आगतिकता



Scanned with CamSca

मांडताना त्यांच्यातील वृत्तीजागर मोहन पाटील अनेक वर्तमान संदर्भासह आणि भव्य अवकाशासह टिपतांना दिसतात. प्रस्थापित सहकाराच्या आवश्यकतेसह जागतिकीकरणाच्या नव्या जाणिवांना न्याय देणारा गांधी- मार्क्समिश्रित नव्या मार्गाचे सूचन भेदरेषेसह स्पष्ट करणारी,१९८० नंतरच्या कादंबऱ्यात विशिष्ट भूमिका घेऊन अवतरणारी ही कादंबरी अपूर्व असून आणिक शक्यतांच्या कक्षा रेखांकित करते हे वैशिष्ट्यपूर्ण वाटते'.[4]

निष्कर्ष

साहित्यिक हा वर्तमान समाजाचा प्रतिनिधी असतो. वर्तमान समाजात जे प्रश्न आणि जी स्थित्यंतरे त्याला बघावयास मिळतात त्यांना कलात्मक स्वरूप देऊन ते प्रश्न आणि ती स्थित्यंतरे तो वर्तमान समाजापुढे कलाकृतीतून मांडत असतो. त्याप्रमाणे 'साखरफेरा' या कादंबरीतून मोहन पाटील यांनी एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे वर्तमान वास्तव त्यामध्ये साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक, कारखान्यांमधील भ्रष्टाचार, या विरुद्धची शेतकरी संघटनेची आंदोलने सोबतच शेतकरी जीवनातीलतील इतर समस्या जसे शेतीसाठी लागणारे पाणी,वीज व शेतकरी जीवनातील आर्थिक विवंचना त्यातून त्यांच्या जीवनाची होणारी शोकांतिका आणि जागतिकीकरणामुळे ग्रामजीवनात घडून आलेले बदल इत्यादींचे चित्रण अधोरेखित केले आहे. एकंदर 'साखरफेरा'या कादंबरीतून एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीचे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे व सहकारी साखर कारखान्यांचे प्रत्यक्ष वास्तव त्यांनी दाखवून दिले आहे.

संदर्भ ग्रंथ

१) पाटील द.तु. 'मोहन पाटील यांच्या कादंबऱ्या', मुक्त शब्द, ऑक्टोबर २०१४, पृष्ठ क्र.२१
२) उ.नि. पृष्ठ क्र.२२
३) पाटील तानाजी, 'मराठी कादंबरी : समीक्षा','साखरफेरा : ऊस शेतकऱ्यांचे प्रश्न भ्रष्ट सहकाराचे चित्रण करणारी कादंबरी', डायमंड पब्लिकेशन, पृष्ठ क्र.१७५
४) ऐनापुरे जी.के, 'साखरफेरा'- मोहन पाटील, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे ३०, प्रथमावृत्ती २००६, मलपृष्ठ.



Scanned with CamSca

230

Impact Factor 5.455 p-ISSN 2349-9370 e-ISSN 2582-4848

# RESEARCH JOURNAL OF INDIA

Peer Reviewed Annual National Research Journal for
Multi-Disciplinary Studies since 2014

Volume 7 Issue 9 October 2020 Regular Issue 2
URL: http://www.indiramahavidyalaya.com/pdf_show.php?unum=593

**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Principal, Indira Mahavidyalaya & Chairman, DBMRC
Presedent, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati

**Associate Editor**
**Dr. Veera Mandavkar**
Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre (DBMRC)

**---- Editorial Board ----**
**Prof. R.M. Wath** **Dr. G.P. Urkunde**
**Dr. R.T. Ade** **Prof. N.V. Narule** **Prof. S.Y. Lakhadive**
Details: http://www.researchjournal.net.in/first/second/EditorialBoard/

**Invited Editors**
1. **Vikram Raje,** 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
2. **Vishal Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
3. **Dr. Anita Gupte Patil,** Auckland, New Zealand
4. **Ranjit Raje,** 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

**Advisory Board**
**Mrs. Sonali Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
**Dr. J. Prabhash,** Former Pro-VC, Uni. of Kerala, Thiruvananthpuram, Director General of State institute of parliamentary affairs, Visiting fellow of diff. Uni. Australia, USA
**Dr. Ramesh Mangal,** NAAC Assessor, Ex. Principal, MKHS Guj. College & Director SVCC, Indore, M.P.
**Dr. Anil Gajbhiye,** Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
**Dr. Shashikant Sawant,** Ex. H.O.D., Marathi, Vikram Vishwavidyalaya, Ujjain, M.P.
**Prof. Dineshkumar Joshi,** Ex. Registrar, S.G.B. Amravati University, Amravati
**Dr. Santoh Thakre,** Ex. Dean, Faculty of Social Science, S.G.B. Amravati Uni., Amravati
**Dr. P.W. Kale,** Ex. Dean, Faculty of Commerce, S.G.B. Amravati University, Amravati
**Dr. R.A. Mishra,** Principal, Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal
**Dr. U.V. Navalekar,** Principal, Abasaheb Parvekar Mahvidyalaya, Yavatmal
**Dr. J.M. Chatur,** Principal, Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal

**Publisher: Dr. Mrs. Veera Mandavkar,** Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401(India)
E mail – researchjournalofindia@gmail.com Alternate mail id – **marathipradhyapak@gmail.com**
Telephone: 07201-226147, 226129, Mob. Chief Editor: 9422867658, Director & Publisher: 9403014885
Websites: **www.researchjournal.net.in** **www.indiramahavidyalaya.com**
**Printer: Seva Prakashan,** Vijay Colony, Rukmini Nagar, Amravati, Maharashtra 444 606
**Cover Page Design & Computer Work: Dr. Pavan Mandavkar**

**Online Access: Free / Subscription for hard copy for a year including special issues Rs. 500/-** by Cheque/DD/netbanking in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre,** A/c No. 60175373000, Bank of Maharashtra, Branch - Azad Maidan Road, Yavatmal, IFSC - MAHB0000047

Scanned with CamScanner

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| | From the Bench of Editor | Dr. Pavan Mandavkar | 2 |
| | Index | | 3 |
| 1 | ROLE OF SPORT PSYCHOLOGY IN ENHANCING MOTIVATION AND PERFORMANCE OF SPORT PLAYERS | Dr. Devanand Ambhore | 4-7 |
| 2 | Water Harvesting – An Exigency of Nation | Prof. Ku. Mangala M. Kanate | 8-11 |
| 3 | Bushfire effects on forest plants and Regeneration of plants in Australia (Study 2019 -2020) | [1]Pranali V. Parimal, [2]Dr. Umeshchandra B. Madavi | 12-15 |
| 4 | महिला सक्षमीकरणाच्या योजनांचे अध्ययन | डॉ. लिना एस. गावंडे | 16-19 |
| 5 | रवींद्र ठाकूर : जीवन आणि साहित्य | प्रा. डॉ. विनोद दे. राठोड | 20-23 |
| 6 | स्त्रीदास्याची वैचारिक भूमिका | प्रा. मृदुला रायपुरे–जांगडेकर | 24-26 |
| 7 | कोवीड – १९ महामारीच्या काळात महिला सरपंचांनी केलेल्या कामाचा अभ्यास | प्रा. डॉ. अरुण शेंडे | 27-31 |
| 8 | करोना (Covid-19) महामारीची पार्श्वभूमी आणि शिक्षण क्षेत्रासमोरील ई–लर्निंगचे आव्हान: एक विश्लेषण | प्रा. सीमा विठ्ठलराव शेटे | 32-36 |
| 9 | गोंदिया जिल्ह्यातील भूमी उपयोजनातील बदलांचे भौगोलिक विश्लेषण (२००१–२०११) | प्रा. एन. व्ही. नरूले | 37-42 |
| 10 | संत तुकारामांचे सामाजिक प्रबोधन : एक अन्वयार्थ | प्रा. रेखा व्ही. इंगोले | 43-46 |
| 11 | गोंड–परधान जमातीची स्वरूप व माहिती | प्रा. अतुलकुमार सारडे | 47-49 |
| 12 | राष्ट्रसंताचे स्त्री सबलीकरण व महिलोन्नती विषयक विचार | डॉ. गजानन भाऊराव घोंगटे | 50-52 |
| 13 | मराठी ग्रामीण साहित्याची भाषा | डॉ. गजानन भाऊराव मुंधे | 53-56 |
| 14 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विवाहविषयक विचार | प्रा. विलास गांजरे | 57-59 |
| 15 | दलित कवितेतील सूर्य प्रतिमा | प्रा. डॉ. रवींद्र मुरमाडे | 60-62 |
| 16 | श्री. गुलाबराव महाराजांची तुंबडी गीते :– एक चिकित्सा | डॉ. संजय नीळकंठ पाटील | 63-66 |
| 17 | माध्यमांच्या जागतिकीकरणाचे सामाजिक परिणाम | डॉ. दिलीप काकडे | 67-69 |
| 18 | ग्रामीण कादंबरीतील सावकार आणि शेतकरी यांच्यातील संघर्षाचे चित्रण | डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे | 70-72 |
| 19 | संत ज्ञानेश्वर यांच्या तत्त्वज्ञानातून समानतेचे बीज | डॉ. प्रेमा लेकुरवाळे | 73-77 |
| 20 | नियतकालिकांचे कार्य : एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. विनोद यू. भालेराव | 78-80 |
| 21 | श्रीचक्रधर स्वामींचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे तत्त्वज्ञान व दृष्टांतपाठाची पार्श्वभूमी | प्रा. डॉ. अविनाश मेश्राम | 81-85 |
| 22 | ग्रामीण भागातील खेळाडूंची दिशा व दुर्दशा | पै. बाळासाहेब शेंदुरकर | 86-88 |
| 23 | कवी बी यांची प्रेमकविता | डॉ. शरद जे. मेश्राम | 89-93 |
| 24 | विलक्षण वास्तवाचा वेध: फेसाटी | डॉ. लहू दिगंबर वाघमारे | 94-102 |
| 25 | ग्रामीण साहित्य: कृषिवल संस्कृतीचा समर्थ आविष्कार | प्रा. साजिद के. शाह | 103-108 |
| 26 | संत चोखामेळा यांचे वैचारिक बंड | प्रा. संजय जी. सिंगनजुडे | 109-115 |
| 27 | नामदेव ढसाळांच्या कवितेतील विचारदर्शन | प्रा.डॉ.सौ. वीरा पवन मांडवकर | 116-120 |


(**Note:** All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)



Scanned with CamSca

# ग्रामीण कादंबरीतील सावकार आणि शेतकरी यांच्यातील संघर्षाचे चित्रण

डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे
शि.प्र.म. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय
चिखली, जि. बुलडाणा, महाराष्ट्र (India) ४४३२०१
Email: gawhanesubhash121@gmail.com भ्रमणध्वनी ९८५०३१४८८५

प्रस्ताविक:—

भारत हा कृषीप्रधान देश आहे. सार्वत्रिक सिंचनाच्या सोयी नसल्यामुळे भारतातील शेतीला 'मान्सूनचा जुगार'मजल्या जाते. कारण ती नैसर्गिक पावसावरच अवलंबून असल्यामुळे शेतीतील उत्पन्नामध्ये शाश्वतता हा भाग नसतो. दर दोन तीन वर्षांमध्ये मान्सूनच्या लहरीपणामुळे शेतक—यांना नापिकीला तोंड द्यावे लागते. शेती उत्पादनातील अशा अनिश्चिततेमुळे शेतकरी हा सतत कर्जात बुडालेला असतो. म.फुल्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' मध्ये त्याच्या कर्जबाजारीपणाचा उल्लेख येतो. म्हणजे दीडशे वर्षांपूर्वीही शेतकरी कर्जबाजारीच होता. म्हणूनच भारतीय शेतकऱ्यांबद्दल असे नेहमीच म्हटले जाते की, 'भारतीय शेतकरी कर्जातच जन्म घेतो, कर्जातच जगतो आणि कर्जातच मरतो'.पूर्वी आजच्या सारख्या बँका पतसंस्था यांचा विस्तार झालेला नव्हता. तेव्हा कृषिक्षेत्राला कर्ज पुरवठा करणारा ग्रामीण भागातील महत्त्वाचा घटक म्हणजे सावकार होय. ग्रामीण भागातील हे सावकार शेतकऱ्यांना शेतीसाठी, लग्नासाठी,धार्मिक विधीसाठी सहज आणि अगदी सोपेपणाने शेत गहाण ठेवून कर्ज देत होते. मात्र सावकाराच्या कर्जाचे व्याजदर अव्वाच्या—सव्वा असल्यामुळे एकदा शेतकरी सावकाराच्या कचाटयात अडकला की त्याची सुटका होणे कठीण होत होते. सावकाराचे व्याज भरता भरता शेतकऱ्याची जमीन घर—दार सावकार हडप करून घेत होते आ.णे त्या शेतकऱ्यांवर देशोधडीला लागण्याची वेळ येत असे.एकविसाव्या शतकामध्ये कर्ज पुरवठा करणाऱ्या हजारो संस्था ग्रामीण भागामध्ये असतांनासुद्धा काही प्रमाणात आजही सावकारकीचा हा व्यवसाय चालतोच. सावकारकीने कृषिव्यवस्थेचे प्रचंड नुकसान आजवर केलेले आहे. अनेक शेतकरी कुटुंबे या सावकारकीची बळी ठरलेली आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांवर सावकारांमार्फत होणाऱ्या अन्याय अत्याचाराची वेदना हा साहित्याचा विषय बनलेला दिसतो. कथा, कविता, कादंबरी इत्यादी साहित्यप्रकारांमध्ये शेतकरी आणि सावकार यांचे संबंध चित्रित झालेले आहेत. ग्रामीण कादंबरीमध्ये कुठला तरी सावकार हे पात्र हमखास असते. सावकारांच्या शेतकऱ्यांवरील अन्याय अत्याचाराचे चित्रण अनेक कादंबरीकारांनी केलेले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात शेतकरी आणि सावकार यांच्यातील ताणतणाव आणि त्यांच्यातील संघर्ष ग्रामीण कादंबरीत कितपत चित्रित झाला यावर प्रकाश टाकला आहे.

महात्मा फुले यांच्या साहित्यातून विशेषत: 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथामधून शेतकरांच्या एकंदर आर्थिक परिस्थितीचा ऊहापोह करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या बिकट आर्थिक परिस्थितीला जबाबदार कोण? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. या प्रभावातूनच मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी लिहिल्या गेली ती 'बळीबा पाटील'. या कादंबरीमध्येही शेतकऱ्यांच्या समस्यांचे वर्णन करतांना दीपचंद मारवाडी या सावकाराचा उल्लेख येऊन जातो. शेतकरी त्याच्याकडून लग्नविधी साठी वगैरे कर्जाऊ रकमा घेतात.धनुर्धारी लिखित दुसरी ग्रामीण कादंबरी 'पिराजी पाटील'मध्येही दुष्काळी परिस्थितीत सावकार व्यापारी हे शेतकऱ्यांना कसे लुटतात याचे चित्रण आलेले आहे. याबाबत वासुदेव मुलाटे म्हणतात, '.... सावकार गावकामगार यांची दडपशाही, खेडूत माणसाला लुबाडण्याची वृत्ती याचेही प्रभावशाली दर्शन या कादंबरीत घडते.

ना.वि. कुळकर्णी, वि.वा.हडप यांनीही सावकार,वतनदार, खोत यांच्या अन्यायाचे प्रसंग आपल्या कादंबऱ्यांमध्ये रंगविलेले आहेत. र.वा.दिघे यांच्या 'पानकळा'मध्ये राजमल मारवाडी शेतकऱ्यांचे शोषण करून त्यांना सतत दारिद्रयात ठेवण्याचा प्रयत्न करतो. सातारा जिल्ह्यात सावकार आणि शेतकरी यांच्यात झालेल्या संघर्षाचे चित्र म.भा. भोसले यांच्या 'उघडया जगात' (१९४१) या कादंबरीत उमटते. श्री.ना.पेंडसे यांच्या 'हद्दपार' कादंबरीतील सावकार सोन्याबापू हा ३५% दराने शेतकऱ्यांना कर्जवाटप करतो. नायक राजे मास्तर सुद्धा त्याच्या कडून कर्ज घेतात. अशा प्रकारे प्रत्यक्ष समाजात अव्वाच्या सव्वा व्याज आकारून सावकारकडून होणाऱ्या लुटीची उदाहरणे आहेत. 'पूर्णामायची लेकरं' मधील बयराम आपल्या भावाला भूत लागले म्हणून ते उतरविण्यासाठी कुण्यातरी नंगे बाबाने सांगितले म्हणून दुल्हभचंद सावकाराकडून 'ठोकपीटी' नावाचे शेत गहाण ठेवून शंभर रुपये कर्ज घेतो.



Scanned with CamScanner

नापिकीमुळे पुढे ते शेत सावकाराच्या घशात जाते. साठपूर्वकाळात बँका पतसंस्था यांचे जाळे नव्हते.त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणारा ग्रामीण भागातील त्या काळातील महत्त्वाचा घटक म्हणजे सावकार. मात्र त्याचे व्याजाचे दर प्रचंड असल्यामुळे सर्वसामान्य शेतकरी त्याच्या आर्थिक कचाट्यातून सुटू शकत नसत. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाचे हे दु:ख, ह्या यातना बघून या साठपूर्व काळातील कादंबरीकारांनी त्यांच्या कादंबरीतून शेतकरी आणि सावकार यांच्यातील संघर्ष चित्रित केला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात सावकारी पद्धतीवर निर्बंध घालण्यात आलेय परंतु तरीही अवैध मार्गाने हा सावकारी व्यवसाय ग्रामीण भागात साठोत्तर काळातही तेजीत होता.त्यामुळेच अण्णाभाऊ साठेंच्या 'वारणेचा वाघ' मधून शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्या सावकाराविरुद्ध सत्तू हा नायक लढताना दिसतो. सर्वसामान्य शेतकऱ्याला आपल्या मुलीचे लग्न म्हणजे जीवनातील फार मोठी लढाई वाटत असते. त्यामुळे लग्न समारंभ चांगला व्हावा, मुलगी चांगल्या घरात द्यावी. यासाठी प्रसंगी कर्ज काढून,आर्थिक अडचणी सहन करून तो हे कार्य पार पाडीत असतो. 'हाल्या हाल्या दुधू द' या कादंबरीतील नायक न्यानबा याच अपेक्षेपोटी मुलीच्या लग्नासाठी यशवंता सावकाराकडे शेत गहाण ठेवून पाच हजार रुपये कर्ज घेतो व मुलीचे लग्न करतो. तिथपासून हा सावकारी शनी न्यानबाच्या घरात शिरतो आणि शेवटी तो न्यानबाला कायमचाच घरातून बाहेर काढतो. शेतकऱ्यांच्या जीवनातील सावकारकीच्या या जाचाबद्दल कादंबरीचे लेखक बाबाराव मुसळे म्हणतात, 'शोषक–शोषित हे जेथे दोन माणसं एकत्र येतात य तिथलं वास्तव असते एकानं दुसऱ्याच्या श्रमाचं,घामाचं, कष्टाचं,अस्तित्वाचं शोषण करावे. ही पूर्वापार चालत आलेली रीत आहे.जेथे सगळे व्यवहार कोरड्या,भावनाशून्य आनितीतून केले जातात तेथे माणुसकीला,नात्यागोत्याला, सद्भाव–सद्विचाराला, सहकार्याला,संवेदनेला,कुठलंच मोल नसते.यशवंत सावकार आणि न्यानबा यांच्यामधील परस्पर संबंध हा या पद्धतीचा काळाकुट्ट, किळसवाणा पडदा आहे'. सावकारकीच्या जाचापाई न्यानबासारखी उद्ध्वस्त होणारी अनेक कुटुंबे समाजात होती. 'विषवृक्षाच्या मुळ्या'मधील लिंगाप्पा सावकार, 'चारापाणी' मधील बाबाराव शेळके सारखे सावकार दुष्काळी परिस्थितीत मुद्दामच पैशांचा आग्रह करून शेतकऱ्यांची शेते गहाण ठेवून घेतात आणि कर्ज थकले म्हणून शेतकऱ्यांची शेतं फस्त करतात. हे तत्कालीन सावकार अत्यंत स्वार्थी वृत्तीचे, केवळ स्वत:चे हित बघणारे, कुठलीही दया–माया नसणारे असे होते.

नव्वदोत्तर काळात बँका, पतसंस्था यांचा विस्तार सर्वत्र मोठ्या प्रमाणात झाला. मात्र तरीही ही सावकारकी नामशेष झाली नाही. सर्वसामान्य शेतकऱ्याला शेतीसाठी कर्जपुरवठा करताना लागणारी कागदपत्रे,कर्ज मंजूर करण्याच्या जाचक अटी, प्रशासकीय अधिकाऱ्यांना द्यावी लागणारी लाच इत्यादींमुळे या पतसंस्थांकडून शेतीसाठी सहज कर्ज उपलब्ध होत नव्हते. त्यामुळे छोटा–मोठा शेतकरी जास्त व्याज देऊन का होईना परंतु सहज उपलब्ध होणाऱ्या सावकाराच्या कर्जाकडे वळत होता. 'पांगिरा' या कादंबरीतील सावकार शेतकऱ्याच्या एकत्र कुटुंबात भांडणे लावून एका भावाला वेगळे काढतो आणि त्याला कर्जाऊ रक्कम देऊन शेवटी त्याचे शेत फस्त करून टाकतो. तानाजी राऊ पाटील यांच्या 'आभाळ' या कादंबरीत भीमाबा आणि बापू कडवळ हे दोघे श्रीमंत शेतकरी ते सावकारकी सुद्धा करतात, गावात त्यांचे दारूचे दुकानही आहे. या धनदांडग्यांची संपूर्ण गावावर प्रचंड दहशत आहे. मोलमजुरी करणाऱ्या बायकांवरही त्यांची वाईट नजर जाते. त्या त्यांच्या वासनेच्या शिकार होतात. भीमाबा हा सावकार नायक गोपाळाला व्यवहारात फसवून उभ्या पिकाचे शेत शेवटी ताब्यात घेतो व भूमिहीन बनवतो. रवींद्र ठाकूर या कादंबरीबद्दल म्हणतात,'अशीही कर्जात जन्मणाऱ्या,कर्जात जगणांया आणि कर्जातच मरणाऱ्या भारतीय अल्पभूधारक शेतकऱ्यांची प्रातिनिधिक कथा आहे'. अशाप्रकारे सर्वसामान्य अल्पभूधारक शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त करणारे सावकार ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या कादंबयांमध्ये चित्रित करून या व्यवस्थेत पिळल्या गेलेल्या शेतकऱ्यांचे दु:ख वास्तव रूपात जगासमोर मांडले आहे.

एकविसाव्या शतकामध्ये जागतिकीकरणाच्या झळा कृषिव्यवस्थेसाठी अधिक बाधक ठरू लागल्या. या काळात बँका,पतसंस्था यांचे ग्रामीण भागात प्रचंड जाळे पसरले. त्यामुळे सावकारांची दहशत काही प्रमाणात कमी झाली. मात्र एकविसाव्या शतकातील शेतकरी या वाढलेल्या बँका, पतसंस्थांकडून कर्ज काढून शेती विकासासाठी खर्च करू लागले. अवैधरित्या सावकारी करणाऱ्या सावकारांचा पाश जाऊन बँका,पतसंस्था या शासनमान्य संस्थांचा पाश शेतकऱ्याभोवती पडू लागला. गावागावात बँका झाल्यामुळे कर्ज घेण्याचे आणि कर्जबाजारी होण्याचेही प्रमाण वाढले. एक प्रकारे या संस्थांनी सावकाराचीच भूमिका पुढील काळात पार पाडली आणि कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या घरादारांचा लिलावही केला. या काळात,बँका,पतसंस्था, व्यापारी, दलाल,सरकारी भ्रष्ट यंत्रणा सोबतच सावकार आणि नैसर्गिक दुष्टचक्र असा समस्यांचा गराडा शेतकऱ्यांभोवती पडला. या संपूर्ण शोषणसाखळीचे चित्र भीमराव वाघचौरे यांच्या 'गराडा' या कादंबरीत वास्तवरित्या रेखाटले आहे.



Scanned with CamSca

सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' या कादंबरीमध्ये दगडू महाकाळ सारखा सावकार परत दिसतो. बँका किंवा पतसंस्था यामधून कर्ज काढल्यानंतर शेतीतून उत्पन्न मिळत नसल्यामुळे शेतकरी ते कर्ज फेडू शकत नाही. निसर्गाच्या दुष्टचक्रामुळे बऱ्याच वेळेस दुबार पेरणीचे संकट उभे राहते. अशा वेळेला शेतकऱ्यांना सावकाराचा उंबरठा ओलांडावाच लागतो. 'बारोमास' मध्ये बळीमामाचे दहा एकर शेत घेणारा वरली मटक्याचा धंदा चालवणारा चोपडा शेठ, भडगावचा बाळू शेठ, सांजोळ मधला दगडू महाकाळ असे सावकार अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना गिळंकृत करण्यासाठी टपूनच बसलेले असतात. दुबार पेरणीसाठी बाळू शेठकडून रावसाहेबांनी कर्ज काढले होते.तेव्हा शेत खरेदी करून देण्यासाठी सुभानरावचे जावई रावसाहेबांवर सावकाराने प्रचंड दबाव टाकला आणि रावसाहेबांना हे सावकाराचे वागणे सहन न झाल्यामुळे त्यांनी गळफास लावून शेवटी आत्महत्या केली. स्वतः सुभानरावही मुलगा मधुच्या नोकरीसाठी त्यांचा जीव की प्राण असलेला कल्याणीचा मळा दगडू महाकाळ या सावकाराकडे गहाण टाकतात.एक रकमी परतफेड करू शकत नसल्यामुळे व ज्या काळ्या आईवर जीवापाड प्रेम केले त्या काळ्या आईवर नानू बुढयाच्या समाधीजवळ सावकार दारूच्या पार्ट्या करतो. हे बघून सुभानरावांना आत्यंतिक वेदना होतात. या मनाच्या होणाऱ्या प्रचंड घुसमटीमुळे सुभानराव आत्महत्या करून आपली जीवन यात्रा संपवितात.'पैसा हाच परमेश्वर हे सूत्र ठरल्याने कोठूनही पैसा मिळविण्याची अनेकांची धडपड चालू आहे. याचाच प्रत्यय भडगावचा बाळू शेठ सावकार व दगडू महाकाळ यांच्या वर्तनातून येतो. शेतकऱ्याला केवळ व्याजाने पैसे देऊनच न थांबता त्यांची शेती लुबाडलण्यावर यांची नजर आहे.एकूणच रावसाहेब व सुभानराव यांच्या विमनस्क स्थितीस सावकारी फासच कारणीभूत आहे. शासकीय नोकरदारांचे बेजबाबदार वर्तन व खाजगी सावकारांचा अतिरेक अशा विचित्र मन:स्थितीत शेतकऱ्यांना जगणेही असह्य होते. हे भीषण समाजवास्तव कादंबरीतून प्रत्ययास येते'. ('साखरफेरा' २००६) या मोहन मोहन पाटील यांच्या कादंबरीतील नायक किशा साखर कारखान्यामार्फत चालवल्या जाणाऱ्या पतसंस्थेचे कर्ज ऊस लागवडीसाठी घेतो. ही पतसंस्था बँकेच्या व्याजदरापेक्षा दोन ते तीन टक्के जादा दराने कर्ज देते. ऊस परिपक्व झाल्यानंतर कारखान्यात नेल्यावर उसाच्या येणाऱ्या रकमेतून ते कर्ज फेडले जाणार असते. परंतु अशाश्वत शेतीमुळे किश्याचा ऊस हातचा जातो व त्याचे कर्ज तसेच राहते. सन २००९ मधील रवींद्र शोभणे यांच्या 'पांढर'या कादंबरीमध्येही सावकारकीचा उल्लेख येतो. साहेबराव पाटील हे तसे मोठे कास्तकार आहेत. नरखेडचा एक व्यापारी सावकार साहेबराव पाटलांना वाडी नावाच्या शेतात बोअर घेण्यासाठी दोन लाख रुपये कर्ज देतो. साहेबराव पाटील पिढीजात साठ एकराचे मालक परंतु ते आजपर्यंतच्या या शेती व्यवसायात दोन लाख रुपयांचीही कमाई करू शकले नाहीत. पाणी टंचाई निर्माण झाली म्हणून बोअर घ्यायचा तर कर्ज घेऊनच करावा लागतो. पुढे ते कर्ज फेडले जाऊ शकत नाही. शेवटी कर्जाच्या ताणतणावामुळे हृदयघाताने त्यांचा मृत्यू होतो. आजवर सावकार आणि शेतकरी यांच्या या पिढीजात व्यवहारात, त्यातून होणाऱ्या संघर्षात हजारो शेतकऱ्यांचे बळी गेलेले आहेत. साहित्यकारांच्या संवेदनशील मनाने विशेषतः ग्रामीण कादंबरीकारांनी शेतकरी जीवनातील हे भयानक दुःख त्यांच्या कादंबऱ्यांमधून व्यक्त केले आहे.

## निष्कर्ष :—

सावकारी पद्धतीने या कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक मदत केली आहे. मात्र एकदा कर्ज घेतल्यानंतर शेतीच्या दुष्ट चक्रामुळे व सावकाराच्या प्रचंड व्याजदरामुळे शेतकरी ते कर्ज फेडू शकलेला नाही आणि त्यामुळे सावकाराच्या तो कचाट्यात अडकला व आत्मनाश करून बसलेला आहे. अलीकडील काळात सावकारकीचे प्रस्थ जरी कमी झालेले असले तरी वेगवेगळया बँका,पतसंस्था यांच्याकडून कर्ज घेऊन शेतकरी अधिक प्रमाणात कर्जबाजारी झाले आहेत. कर्ज फेडू न शकल्यामुळे त्यांच्या जमिनींचे लिलावही झालेले आहेत. 'हाल्या हाल्या दुधू दे' मधील न्यानबा, 'बारोमास' मधील सुभानराव,रावसाहेब तसेच 'पांढर' मधील साहेबराव पाटील, पंढरी आगे, गजानन पिकले हे सर्व तसेच इतरही कादंबऱ्यांमधील नायक सावकारकीचेच बळी आहेत. समाजामध्ये घडणाऱ्या घटनांचे साक्षीदार असलेल्या या संवेदनशील मनाच्या लेखकांनी विशेषतः साठोत्तर,नव्वदोत्तर व एकविसाव्या शतकात अलीकडील काळातील ग्रामीण कादंबरीकारांनी शेतकरी आणि सावकार यांच्यातील संघर्षामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या शोकांतिका वास्तव रुपात मोठ्या पोटतिडकीने चित्रित केल्या आहेत.

## संदर्भ ग्रंथ:—

१) मुलाटे वासुदेव, 'ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा', स्वरूप प्रकाशन, डिसें.२००५, पृष्ठ क्र. ९९.
२) मुसळे बाबाराव, 'तृतीय रत्न—हाल्या दुधू दे: एक अन्वयार्थ' बजाज पब्लिकेशन अमरावती,२०१० भाग २, पृ.३.
३) ठाकूर रवींद्र,'मराठी ग्रामीण कादंबरी', स्नेहवर्धन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, पृष्ठ क्र. १७९
४) येळवंडे लक्ष्मीकांत, 'सदानंद देशमुखांच्या कादंबऱ्या: एक आकलन', स्मितांजली प्रकाशन, अहमदनगर, पृ. ५९—६०

❖❖❖



Scanned with CamSca

ISSN-2320-4439
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Special Issue II Aug.2020



ART'S | COMMERCE | SCIENCE | SOCIAL SCIENCE |
EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT |
LAW | PHARMACY | PHYSICAL EDUCATION | AGRICULTURE |
JOURNALISM | MUSIC | LIBRARY SCIENCE |

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

Scanned with CamSca

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

Scanned with CamSca

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Gender differences pertaining to work life balance | Nikhat Tabasum<br>Dr. B S Hugar | 1-7 |
| 2 | E-Learning - A New Direction Of Digital India | Adv. Dr.shivangi k.zarkar | 8-15 |
| 3 | Diara Land In The Holy Ganga Of Bihar | Dr. Alpna Jyoti | 16-19 |
| 4 | The Impact Of Training And Development On Organizational Overall Performance In It Industry | Shilpa S. Hiregoudar<br>Dr. Rekha N. Patil | 20-31 |
| 5 | During Pandemic Covid 19 Psychological Behavior Of School Students On Light Of Online Education | Urna Bhattacharjee | 32-34 |
| 6 | A Study On The Impact Of Performance Management Systems On Employee's Performance In Degree Institutions In Kalaburagi | Archana V. Padgul (M Kinagi)<br>Dr. Rekha N. Patil | 35-43 |
| 7 | Reading habit among Mahila Mahavidhyalay Georai :A Case Study | Dr.Sanjay L. Bhedekar | 44-46 |
| 8 | Library Accessibility To The Researchers And E-Resources Based Information Services | Dr.sanjay Bhedekar | 47-49 |
| 9 | The Ombudsman Scheme for Non-banking Financial Companies 2018-An Overview | Dr.Swati Joshi | 50-55 |
| 10 | Ego As Premise Of Objectivism In Ayn Rand's Theory | Dr.Pradip.G.Sonawane | 56-58 |
| 11 | Review on-Hydrothermal synthesis of Cobalt Ferrite and substituted Cobalt Ferrite | Santosh M. Arade | 59-63 |
| 12 | Agricultural problems in Marathwada Region | Dr. Syed Tanvir Badruddin | 64-67 |
| 13 | Attractive result for some non linear functional differential and intergral equation | Mr.P. M. More | 68-78 |
| 14 | Ichalkaranji as a commercial tourism center in kolhapur district (ms): a geographical study | Dr. Dilip A. Gade | 79-87 |
| 15 | Digital transformation of academic libraries: Opportunities and Challenges. | Sarika Bhagwanrao Rengunthwar | 88-90 |
| 16 | Non performing assets performance in banking sector in india | Prof. Dr.Dattatraya S. Tambe | 91-97 |
| 17 | "Migration Pattern of Agricultural Works in Beed Taluka " | Dr.Ghodke Jitendra Vitthalrao | 98-101 |
| 18 | तहान' कादंबरीतील पाणी टंचाई व ग्रामजीवनातील बदलांचे चित्रण | डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे | 102-106 |
| 19 | महात्मा गांधी यांचे सामाजिक विचार | प्रा.मोहन बाबुराव चव्हाण | 107-113 |
| 20 | माध्यमिक शाळांमधील माहिती तंत्रज्ञान साधनांच्या वापराबाबत अडचणींचा शोध- एक अभ्यास | डॉ. विलास उमराश काळे, | 114-117 |


Scanned with CamSca

# 'तहान' कादंबरीतील पाणी टंचाई व ग्रामजीवनातील बदलांचे चित्रण

**डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे**
मराठी विभाग
शि.प्र.म.तात्यासाहेब महाजन कला वाणिज्य महाविद्यालय, चिखली जि.बुलढाणा

**प्रस्तावना :-**

सदानंद देशमुख हे मराठी ग्रामीण साहित्यात कथा,कादंबरी,कविता या साहित्य प्रकारांचे लेखन करून नवोदत्तर काळात स्थिरावलेले एक महत्त्वाचे लेखक आहेत. मातीचा रंग धारण करून खेडी-शेती-माणूस यांचं अंतरंग त्यांनी त्यांच्या साहित्यातून उलगडून दाखविलं आहे.भारतीय संस्कृतीचे मर्मस्थान असलेल्या खेड्यांची आज अंतर्बाह्य अवस्था कशी आहे हे त्यांच्या लिखाणातून दिसून येते. जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात सुरू झालेल्या बदलांचा ग्रामवासीयांना फायदा झाला का? हे बदल ग्रामीण जनतेच्या आचार विचारात कितपत उतरले? खेड्यातील आर्थिक परिस्थिती बदलली की नाही? असे आजचे मूलभूत प्रश्न त्यांनी त्यांच्या लेखनातून मांडले आहेत. 'तहान'ही कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने १९९८ मध्ये प्रकाशित केलेली कादंबरी आहे. प्रस्तुत कादंबरीतून भीषण अशा पाणीटंचाईचे चित्रण आले आहे. दिवसेंदिवस पाणीटंचाईचा प्रश्न तीव्र होत चालला आहे. दुष्काळी परिस्थितीची झळ सर्वात जास्त ग्रामीण भागात राहणाऱ्यांना भोगावी लागते. स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे उलटून गेली तरी ग्रामीण भागात अशा प्राथमिक सुविधादेखील उपलब्ध होऊ शकल्या नाहीत ही खंत लेखक मनाला अस्वस्थ करणारी वाटते.पाणीटंचाईचे हे भीषण वास्तव सदानंद देशमुख यांनी 'तहान' मधून चित्रित केले आहे. पाणी प्रश्नाबरोबरच ग्रामीण जीवनात होणारे बदल हे पारंपरिक व समाज हिताच्या मूल्यांच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरत आहेत.बदलत्या काळात ग्राम वासियांना लागलेली भौतिक सुखाची अतिरेकी ओढ, कमी वेळात जास्तीत जास्त पैसा मिळविण्याची वाढलेली स्पर्धा,ग्रामीण जीवनात झालेले बदल, अनागरपणाकडून नागरपणाकडे होत असलेली वाटचाल,कुटुंबांचे विघटन, पूर्वापार चालत आलेल्या परंपरांना विरोध करणारी विद्रोही पिढी या सर्वांचा समन्वय 'तहान'मध्ये बघावयास मिळतो. प्रस्तुत शोधनिबंधात 'तहान' कादंबरीतील पाणीटंचाई आणि ग्राम जीवनातील बदलांचे चित्रण यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**भीषण पाणीटंचाईचे चित्रण :-**

'तहान' या कादंबरीच्या शीर्षकातूनच प्रस्तुत कादंबरी पाणी समस्येवरील असल्याचे सूचित होते. नव्वदोत्तरच्या काळातील भीषण पाणीटंचाई बघून तिसरे महायुद्ध पाण्यासाठीच होईल असे भाकित अनेकांनी केलेले आहे. पाणीप्रश्न मांडणाऱ्या पुष्कळ कादंबऱ्या मराठी साहित्यात लिहिल्या गेल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर भारताला आज जवळपास सात दशके पूर्ण होत आहेत;तरीही साध्या अत्यावश्यक अश्या पिण्याच्या पाण्याच्या ग्रामीण भागाच्या समस्या अद्यापही सुटल्या नाहीत.ग्रामीण भागाचे संपूर्ण अर्थकारण या पाण्यावरच अवलंबून असते.त्यामुळेच पाणीटंचाईचा अत्यंत महत्त्वपूर्ण विषय सदानंद देशमुख यांनी 'तहान'मधून मांडला आहे.



Scanned with CamScanner

कादंबरीच्या प्रारंभीच ऊसाला पाणी कमी पडल्यामुळे व साखरकारखाना बंद झाल्यामुळे देवराव बापूंनी उभा ऊस पेटवून दिल्याचा उल्लेख येतो.या सुरुवातीच्या घटनेतूनच भीषण पाणीटंचाईची कल्पना येते. शेतातील विहीरी खोल गेलेल्या त्यामुळे शेतीला पाणी नाही. गावातील विहिरी, हापश्या सुद्धा कोरड्या पडलेल्या. त्यामुळे पाणीटंचाईचे संकट अधिक गहिरे होत जाते. गावात पाणी टंचाईबद्दल लोक चर्चा करतात,वर्तमानपत्रातील बातम्या वाचतात.पाणीटंचाईचे कारण काय? यावरही ते चर्चा करतात.दिवसेंदिवस सिंचनाचे प्रमाण वाढत चालल्यामुळे जमिनीच्या पोटातील पाण्याचा प्रचंड उपसा होऊ लागला व त्यातूनच अशी भीषण पाणीटंचाई पुढे येऊ लागली. शासनाने या पाणीटंचाईकडे फारसे गांभीर्याने न बघितल्यामुळे ग्रामीण समाज सैरभैर झाला. पिण्याच्या पाण्याचीच एवढी गंभीर समस्या म्हटल्यानंतर शेतीसाठीच्या पाण्याचा प्रश्नच समोर येत नाही. केवळ पिण्याचे पाणी आणण्यासाठी गावकऱ्यांना संपूर्ण दिवस घालवावा लागतो. कादंबरीतील सारंगपुरचे लोक शौचासाठी पाणी पुरवून पुरवून वापरतात. आठ-आठ दिवस आंघोळी करीत नाहीत. द्वारका उबरहांडे आणि तारा मोहळे या स्त्रियांचे हापशीवरील नंबरसाठी कपडे फाटेपर्यंत झालेले भांडण, कुतरबावडीत पाणी आणण्यासाठी गेलेल्या रामा ऊमाळेच्या मुलीचा कोरड्या विहिरीत पडून झालेला मृत्यू, रामकोरच्या रांजनातील चोरीस गेलेले पाणी, हॉटेलमध्ये काही वस्तू घेतल्याशिवाय पिण्याचे पाणी दिल्या जात नाही त्यामुळे बसस्टॅंडवर पाण्यावाचून एका गरीब स्त्रीचे चक्कर येऊन बेशुद्ध पडणे, शाळेत पिण्याला पाणी नसल्यामुळे मुलांचे शाळेत जाणे बंद होणे, शेजारच्या पारखेडला आग लागली तेव्हा अग्निशमन दलाच्या गाड्यांच्या पाईपचे पाणी पिऊन लोकांनी तहान भागविणे-आंघोळी करून घेणे कादंबरीतील हे सर्व प्रसंग पाणीटंचाईची भीषणता दर्शविणारे आहेत. या प्रचंड पाणीटंचाईमुळे गावामध्ये पाण्याला सोन्याचा भाव येतो. नव्या पिढीचा प्रतिनिधी असलेला राघोबाचा मुलगा बबन वडिलांचा विरोध असतांनासुद्धा पाणी विकण्याचा व्यवसाय सुरू करतो. कमी कष्टामध्ये पाण्याचा भरपूर पैसा मिळू लागल्यामुळे त्याची लालसा दिवसेंदिवस वाढत जाते व तो पाण्याच्या किमती वाढवत जातो. लोकांना नाईलाजास्तव जादा पैसे देऊन पाणी विकत घ्यावेच लागते. 'तहान' मधील पाणी प्रश्नाबद्दल द.ता.भोसले म्हणतात, 'पाण्याला आपल्या जीवनात खरोखरच पर्याय नाही.....पाणी नसेल तर त्याला अन्य कोणताही पर्याय नाही. पाण्याऐवजी दूध चालत नाही अथवा खूप तहान लागली म्हणून चहा वा मद्य हा त्याला पर्याय ठरू शकत नाही. आपल्या प्रत्येक क्षणाला, जीवनाच्या कणाकणाला नि संवर्धन-विकसनाला हे पाणी अत्यंत अनिवार्य गोष्ट आहे. हे सत्य 'तहान' कादंबरीच्या वाचनानंतर आपल्या मनावर खोलवर ठसत जाते'.[1] पाणीटंचाईमुळे खरोखरच संवर्धन आणि विकसनच ठप्प पडते याचा प्रत्यय तमाम ग्रामवासी घेत होते. याचे अनेक प्रसंगांद्वारे सदानंद देशमुख यांनी वास्तवाभिमुख चित्र उभे केलेआहे. 'या कादंबरीत दुष्काळामुळे निर्माण झालेला पाणीटंचाईचा उग्र प्रश्न खेड्यातील लोकांचे जीवन कसे उद्ध्वस्त करून टाकतो यावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी लेखकाने सर्वाधिक प्रसंग चित्रित केलेले आहेत. हातात भांडी आणि बादल्या घेऊन दिवस-रात्र पाण्यासाठी वणवण भटकणारी माणसे,तळातल्या गाळमिश्रीत पाण्यासाठी विहिरीवर गर्दी करणाऱ्या बायका, कोरड्या पडलेल्या हापश्यांशी आदळ आपट करणारी पोरे, टॅंकरची आशाळभूतपणे वाट पाहणारी माणसे,पाण्यासाठी दूरवरच्या रानावनात हिंडणाऱ्या मुली, पाण्यावाचून तडफडणारी जनावरे,वाटेल तेवढी किंमत देऊन पाणी विकत घेणारे मध्यमवर्गीय नोकरदार आणि हॉटेलवाले,



Scanned with CamSca

पाणीटंचाईची यांझ चर्चा करणारी रिकामटेकडी माणसे नि यार्तांहार या सर्वांचे चित्रण या कादंबरीत अधिक प्रमाणात आलेले आहे. त्यामुळे ही सारी माणसे पाण्यासाठी जगतात आणि पाण्यावरच जगतात असे प्रत्ययाला येते. एका पाण्याच्या प्राप्तीसाठी त्यांचे श्वास,त्यांचे प्रयास,त्यांची शक्ती व जीवनाचे सारे स्त्रोत अडकून पडलेले आहेत असे जाणवून जाते. काट्याकुट्यांनी गच्च झालेल्या आडरानात एखादी फाटलेली चिंधी अडकून पडावी अन् ती त्यामुळे अधिक विदीर्ण व्हावी अशी अवस्था ग्रामीण माणसांच्या जीवनाची झालेली आपल्या प्रत्ययाला येते'.[२] त्यामुळेच दुष्काळ, पाणीटंचाई हे कृषिसंस्कृतीला मिळालेले शापच म्हणावे लागतील.

'तहान' मध्ये पाणी प्रश्नांसाठी उपोषण, घागरमोर्चा, आमदार-खासदारांना घेराव इत्यादीचेही प्रसंग चित्रित होतात. गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा होतो. पाणी विहीरीत सोडल्यानंतर तिथे उडणारी झुंबड तसेच त्याच टँकरमधून हॉटेलवाले, पोलीसवाले पैसे देऊन कसे पाणी घेतात व इतर सामान्य ग्रामवासीयांना मात्र विहिरीत सोडलेले गढूळ पाणी दिव्य करून मिळवावे लागते इत्यादीचे जिवंत चित्रण उभे राहिले आहे. ग्रामीण भागातील शेतीसाठी पाणी हे जीव की प्राण असते. ग्रामीण अर्थचक्राची गती केवळ पाण्यावरच अवलंबून असते. मात्र नव्वदोत्तर काळात मान्सूनचा लहरीपणा मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे दुष्काळी परिस्थिती वर्षागणिक समोर येऊ लागली. म्हणूनच द. ता. भोसले म्हणतात त्याप्रमाणे फाटलेल्या चिंधीसारखी ग्रामीणांंची अवस्था झाली आहे. सदानंद देशमुख यांनी ही अवस्था 'तहान' मधून वास्तवदर्शी उभी केली आहे.

**ग्रामजीवनातील झपाट्याने होणाऱ्या बदलांचे चित्रण :-**

ग्रामीण जीवनात झपाट्याने होत चाललेल्या बदलांचे चित्रण 'तहान'मधून मोठ्या प्रमाणात आले आहे. कृषी व्यवस्थेतील पारंपरिक जीवन वेगवेगळ्या अंगांनी आज बदलत चालले आहे. याची नोंद लेखक मन घेते. शासनाच्या नवनव्या विकासाच्या योजनांमुळे ग्रामीण भागात,छोट्या-मोठ्या खेड्यात शासकीय दवाखाने, पोलीस स्टेशन,शाळा हायस्कूल, साखर कारखाने, छोटे-मोठे लघुउद्योग या सर्वांच्या प्रभावामुळे ग्रामीण जीवनात बदल झालेले दिसून येतात. नवीन पिढी कष्टाच्या कामापासून दूर जाताना दिसते आहे. शहरातील चकचकीत वस्तूंचे आकर्षण निर्माण झाल्याने तसेच कमी कष्टात अधिक मोबदला मिळावा ही वृत्ती ग्रामीण समाजात बळावत चाललेली दिसते. अनुकरणप्रियतेतून दुसऱ्याकडे असलेली वस्तू माझ्याकडेही असली पाहिजे. या हव्यासेपोटी आर्थिक कुवत नसतानाही नवनवीन वस्तू खरेदी करण्याची वृत्ती वाढली आहे. हा एक नवा व्यावहारिक दृष्टीकोन निर्माण झाला आहे. त्याचा परिणाम म्हणजे माणसा-माणसांमधील असलेले जवळिकीचे भावबंध पुसट होत चालले आहेत. याचा प्रत्यय 'तहान' मधून वास्तव रुपात येतो.

कादंबरीतील सारंगपूर हे गाव हायवेला लागून असल्यामुळे शहरी संस्कृतीचा प्रभाव अशा गावांवर मोठ्या प्रमाणात जाणवतो. हायवे वरील वाहतुकीमुळे गावाजवळ उभे राहिलेले ढाबे, पेट्रोल पंप, एखादे शासकीय कार्यालय, एखादी बँक, बस स्टॅन्ड व त्यावरील चहा नात्याची हॉटेल्स, पानठेले इत्यादी मधून खेड्यांमधून थोड्याफार प्रमाणात रोजगार निर्मितीही झाली आणि गावकऱ्यांच्या राहणीमानातही फरक पडला आहे. सारंगपुरात जुनं गाव व नदीपलीकडे नवीन विकसित वस्ती आहे. नवीन विकसित भागात शाळा,बसस्टॅन्ड, इलेक्ट्रिक बोर्ड ऑफिस,स्टेट बँक,अतिक्रमित झोपडपट्टी, हॉटेल, पेट्रोल पंप,सरकारी दवाखाना,पोलीस स्टेशन, विश्रामगृह,दालमिल, ऑइल मिल



Scanned with CamSca

आहेत. येथून काही लोकांना रोजगार मिळतो. बस स्टँडच्या अवतीभोवती ज्यांच्या जमिनी आहेत त्यांनी त्या एन.ए. करून घेतल्या आहेत व व त्यातील प्लॉट ते विकत आहेत.

सारंगपूरात अनेक घरांवर टीव्हीचे अँटेना उभे राहिलेले आहेत. दूरदर्शनच्या माध्यमातून बघितल्या जाणाऱ्या कार्यक्रमांमुळे ग्रामीण भागात सांस्कृतिक घुसळण सुरू झाली आहे. गावामध्ये उन्हाळा आणि हिवाळा या ऋतूमध्ये एक टुरिंग टॉकीज येऊन उभी राहते. त्यातून गावातील व आसपासच्या गावातील लोक मनोरंजनाची भूक भागवितात. प्रमोद नवले हा तरुण बस स्टँडवर एक पेपरची एजन्सी घेतो व वर्तमानपत्रासोबतच काही फिल्मी मासिकेही तो विकतो. दूरदर्शन वरील स्टार टीव्ही सारख्या परदेशी चैनल वरून अर्धनग्न गो-या बायका बघून गावागावातील वातावरण दिवसेंदिवस अधिकाधिक गढूळ होत चालले आहे. लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयीतही बदल होऊ लागलेत. गावाला लागूनच हायवेवर ढाबे सुरू झाले.त्यामुळे लोकांना अधून-मधून ढाब्यावरील जेवणाचा आस्वाद घ्यावासा वाटू लागला. कादंबरीचा नायक बबनही अनेकदा त्या ढाब्यावर जेवणाचा आस्वाद घेतो. सारंगपूरात आता कोल्ड्रिंक्स उभ्या राहिल्या आहेत. त्यातून थम्सअप,पेप्सी इत्यादी पेये विकल्या जातात. उभ्या राहिलेल्या पानठेल्यांवर मोठ्या प्रमाणात गुटख्याच्या पुड्या विकल्या जातात. प्रकाश पेडगावकरांचे देशी दारूचे दुकानही गावात आहे. रोडवरील ढाब्यांवर इंग्लिश दारू,बियर सुद्धा मिळते. अशा ढाब्यांवर नोकरदार वर्ग व गावातील काही श्रीमंतांच्या पाट्यां चालतात. तिथे काम करणाऱ्या गावातील पोरांवर त्याचा वाईट परिणाम होतो. शहरी राहणीमानात वापरल्या जाणाऱ्या अनेक स्टेशनरी वस्तू सारंगपूरातही दाखल झाल्या आहेत. स्नो,पावडर,सौंदर्य क्रीम, शाम्पू,हेअरडाय,आरसे, आंघोळीचे वेगवेगळी साबणं इत्यादी वस्तू दुकानातून विकल्या जातात. या सर्व बदलांमुळे खेड्याचे जुने रूप पालटून शहरीकरणाकडे ओढा वाढलेला दिसतो.

शेतकरी कुटुंबातील नव्या पिढीला शेतीबद्दल कुठलीही आस्था राहिलेली दिसत नाही. बबन,रामकोर आणि राघोजी यांच्या संवादातून बबनला शेती बद्दल अजिबात आस्था वाटत नाही. शेतामध्ये ढोरासारखे कष्ट करूनही दोन रुपये हातात दिसत नाहीत. पाणीटंचाईच्या काळात मात्र एक पाण्याची खेप टाकली की शंभर रुपये नगदी आणि लगेच मिळतात. त्यामुळे बबन शेती आणि बैलांकडे साफ दुर्लक्ष करतो. शेतकरी आणि बैल यांचे पारंपरिक अतूट नाते तो पूर्णपणे विसरतो. बैलांना तो यंत्र समजू लागतो. मात्र राघोजीसारखी जुनी पिढी स्वतः उपाशी राहील पण बैलांची अगोदर काळजी घेते. परंतु बबन सारख्या नव्या पिढीत प्राणीमात्राविषयीची ही आस्था संपलेली आहे. बबनला ट्रॅक्टर हा बैलांना पर्याय वाटतो. अल्पभूधारक असूनही बैलांऐवजी तो ट्रॅक्टरने नांगरटी करू पाहतो. 'शेती हा शेतकऱ्याचा धर्म आहे' ह्या जुन्या पिढीच्या संकल्पनेला नव्या पिढीकडून तडे गेले. नाइलाजास्तव ही नवी पिढी शेतीमध्ये राबतांना दिसते.

सारंगपूरातील सामान्य जनता आपल्या समस्यांबद्दल, अधिकाराबद्दल जागृत झालेली दिसते. सारंगपूरात भीषण पाणीटंचाईमुळे उपोषण,घागर मोर्चा यासारखी आंदोलने केल्या जातात. नळ योजनेची मागणी केली जाते. गावातील ग्रामपंचायत मेंबर जनाबाई गाव सभेमध्ये माईक हातात घेऊन धिटाईने बोलते. गावातील हे बदलही वाखाणण्याजोगे आहेत.नव्वदच्या दशकात



Scanned with CamSca

ग्रामीण भागात टीव्ही सारखे माध्यम आले, दळणवळणाच्या साधनांत झालेली वाढ,वृतपत्रे, मासिके,शिक्षणाचा विकास, शेतीचे यांत्रिकीकरण इत्यादींमुळे प्रचंड वेगात परिवर्तन झाले. त्यामुळे लोकांच्या राहणीमानातही बदल झाले. खर्चात मात्र प्रचंड वाढ झाली. दुसऱ्या बाजूला शेतीचे यांत्रिकीकरण,खते, औषधे यांच्या वाढलेल्या किंमती आणि शहरी प्रभावातले राहणीमान यामुळे खर्च प्रचंड वाढला. सोबतच निसर्गाचा लहरीपणा दरवर्षी वाढत गेल्यामुळे खर्चाच्या तुलनेत शेतीतून येणारे उत्पन्न बरोबरीत किंवा तोट्यात जाऊ लागले व शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणात मोठ्या प्रमाणात वाढ व्हायला लागली.

अल्पावधीत ग्रामजीवनात झालेले हे बदल 'तहान' मधून वास्तवरुपात अधोरेखित झाले आहेत. याबद्दल डॉ.मनोहर जाधव म्हणतात,'तहान' मधील सारंगपूर हे गाव महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील प्रातिनिधिक गाव म्हणून समोर येते. औद्योगिकीकरणामुळे, शिक्षणाच्या प्रसारामुळे, शाळा-महाविद्यालयांच्या स्थापनेमुळे,बँका-सहकारी सोसायट्यांमुळे गावाचा चेहरा बदलत चालला आहे.पूर्वसुरींची संस्कृती आणि राहणीमान बदलत्या काळात असंगत होत आहे. निमशहरांकडे आता गावाची वाटचाल सुरू आहे. विशेषतः जी गावं दळणवळणाच्या केंद्राजवळ आहेत किंवा राष्ट्रीय महामार्गालगत जी खेडी आहेत त्या ठिकाणी शहरी जीवनाचा स्पर्श जाणवू लागला आहे.[३] या शहरीजीवनाच्या आकर्षणातून ग्रामवासियांच्या मनामध्ये वेगवेगळ्या प्रकारची तहान निर्माण झाली आहे. 'पाण्यावाचून तळमळणारे ग्रामजीवन हा या कादंबरीचा गाभा नाही.माणसे तहानेने व्याकुळतात,पाण्यासाठी तळमळतात त्याहीपेक्षा जास्त तडफड होते भौतिक सुखाच्या मायावी मृगजळामागे धावणाऱ्या तरुण मनाला पाहतांना.त्या तडफडीची आणि त्यातून मागल्या पिढीच्या वाट्याला येणाऱ्या घुसमटीची कहाणी म्हणजे 'तहान'.❐ या कादंबरीत ग्रामीणांना ज्या विविध प्रकारच्या तहानेची ओढ लागली आहे त्याला आणखी एक कारण म्हणजे खेड्यातील जनतेच्या दृष्टीस पडणारे खेड्यात राहणाऱ्या नोकरदार लोकांचे राहणीमान होय.'खेड्यात बँक,पोलीस, शिक्षक,यांच्या रूपाने येणारे नोकरदार ज्यावेळी इतरांना पहावयास मिळतात; त्या वेळी त्यांची स्थिती,त्यांच्याकडची भौतिक सुखे पाहिल्यानंतर कष्टाचे आयुष्य आपण किती दिवस जगायचे?असे इतरांनाही वाटते'.❐ या अनुकरणप्रियतेतून ग्रामीण जनतेच्या राहणीमानात प्रचंड बदल झालेत. हे सर्व बदल स्वीकारताना कृषिव्यवस्थेतून मिळणारे उत्पन्न मात्र कमी पडत गेले व आर्थिक विवंचना वाढत गेल्या. ग्रामजीवनातील हे सर्व बदल सदानंद देशमुख यांनी वास्तवदर्शी चित्रीत केले आहेत.

**निष्कर्ष :-**

नव्वदोत्तर काळात कृषी सिंचननाचे प्रमाण वाढत गेले. पाण्याचा अतिरिक्त उपसा झाल्यामुळे पाणी टंचाई जाणवू लागली. पिण्याच्या पाण्याचा भीषण प्रश्न ग्रामीण भागात निर्माण होऊ लागला. तसेच शहरीकरणाच्या प्रभावामुळे शहरी वातावरणाचा ग्रामीण भागात शिरकाव होऊन ग्रामवासियांच्या राहणीमानात बदल झालेत.स्वार्थी आणि चंगळवादी वृत्ती वाढीस लागली. नवीन पिढी पूर्णतः शेतीपासून दूर जात जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली गेली व बदलली. अल्पावधीत कमीत-कमी श्रमात जास्तीत जास्त पैसा कसा जमविता येईल याचा विचार ही पिढी करू लागली.त्यामुळे जिव्हाळा,प्रेम, नातीगोती,माणुसकी ही मुल्ये नव्या पिढीकडून पायदळी तुडवल्या गेलीत. जागतिकीकरण स्वीकारल्यानंतर सुरुवातीच्या काळातील ग्रामजीवनातील हे बदल 'तहान' मधून हृदयस्पर्शी आणि वास्तवदर्शी चित्रित झाले आहेत.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) भोसले द. ता, 'तहानः स्वरूप आणि समीक्षा', 'जीवन-मरणाला व्यापून उरणारी तहान', प्रशांत पब्लिकेशन जळगाव, पृष्ठ १२

२) तत्रैव, पृष्ठ १५.

३) जाधव मनोहर, 'तहानः स्वरूप आणि समीक्षा' 'तहानः एक आकलन', प्रशांत पब्लिकेशन जळगाव, पृष्ठ ४५.

४) सावदेकर आशा, 'तहानः स्वरूप आणि समीक्षा', 'ग्रामीण जीवनमूल्यांची शोकांत्मिकाः तहान', प्रशांत पब्लिकेशन जळगाव, पृष्ठ ८२.

५) येळवंडे लक्ष्मीकांत,'सदानंद देशमुखांच्या कादंबऱ्या : एक आकलन', स्मितांजली प्रकाशन अहमदनगर, पृष्ठ ५६.

■■■



Scanned with CamSca